क्रि,किरकोळ अर्ज नं. 83/2026

जयसिंगपूर येथील मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,यांचे कोर्टात

अरविंद कांडेसार ................ अर्जदार

Exh.19
Order- Say of dated
20/06/2026 filed on today.
Hence the said say is seen.

वि.

महा.शासन

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.08.03 17:20:51 +0530

वगैरे ......................जाबदार

यात जाबदार नं. 3 तर्फे अर्जदार यांच्या अर्जास म्हणणे खालीलप्रमाणे

1) प्रस्तुतचा अर्ज व त्यामधील संपूर्ण कथने धांदात खोटी व लबाडीची असल्याने ती या जाबदारांना मान्य व कबूल नाहीत.

2) अर्जदार यांच्या अर्ज कलम 1 मधील मजकुर धांदात खोटा व लबाडीचा असल्याने तो या जाबदारांना मान्य व कबूल नाही

3) अर्जदार यांच्या अर्ज कलम 2 मधील मजकुर धांदात खोटा व लबाडीचा असल्याने तो या जाबदारांना मान्य व कबूल नाही

4) अर्जदार यांच्या अर्ज कलम 3 मधील कॅप्री गोल्ड लोन्स शाखा जयसिंगपूर येथे आय. डी. नं. 2270365 कर्ज खाते नं. 30100040364580 इतकाच मजकुर सर्वसाधारण खरा व बरोबर आहे

5) अर्जदार यांच्या अर्ज कलम 4 मधील येणेप्रमाणे ........ इथपासुन ते ........घेतलेल्या आहेत इथपर्यत चा मजकुर सर्वसाधारण खरा व बरोबर आहे उर्वरित संपूर्ण मजकुर धांदात खोटा व लबाडीचा असल्याने तो या जाबदारांना मान्य व कबूल नाही

6) अर्जदार यांच्या अर्ज कलम 5 ते 9 मधील संपूर्ण मजकुर धांदात खोटा व लबाडीचा असल्याने तो या जाबदारांना मान्य व कबूल नाही. ती शाबीत करण्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदार यांचीच आहे ती त्यांनी काटेकोरपणे शाबीत करणेची आहे

7) खरी वस्तु:स्थिती अशी की,
अर्जदार हे जाबदार यांच्या कॅप्री गोल्ड लोन्स शाखा जयसिंगपूर चे वैयक्तिक कर्जदार आहेत. अर्जदार यांनी आय. डी. नं. 2270365 कर्ज खाते नं.

30100040364580 क्रमांकावर त्यांचे असलेले सोने तारण ठेवून दि. 25/3/2026 रोजी 12 महिन्यांच्या कालावधीकरीता र रु 3000/- इतके कर्ज घेतलेले आहे.तेंव्हापासून आजअखेर अर्जदार यांनी एकही व्याज व मुदद्ल भरलेली नाही.त्याबाबत जाबदार यांनी त्यांच्या असलेल्या शर्ती व अटीनुसार अर्जदार यांना वारंवार त्यांच्या असलेल्या भ्रमणध्वनी क्र. 8983933409 यावर फ़ोनद्वारे , SMS द्वारे संपर्क करुन व्याज व मुदद्ल भरणेबाबत कळविले होते व आहे. तरीदेखील अर्जदार यांनी अद्याप सोन्याच्या कर्जाचा हफ़्ता व व्याज भरलेले नाही.दरम्यान काळात मा. पोलिस उपनिरीक्षक जयसिंगपूर यांनी जाबदार यांच्याकडे दि 10/4/2026 रोजी पत्र पाठवून रागिनी कांडेसार ,अरविंद कांडेसार,व अजय मोहिते तसेच दि 30/3/2026 रोजी सागर कांडेसार यांचे खाते व स्टेटमेंट मागवले व खाते फ्रिज करणेबाबत कळवीले होते.त्याअनुशंगाने जाबदार यांनी त्यांच्या मुख्यालयाकडे पत्र पाठवून परवानगी मागितली व परवानगी मिळाल्यानंतर मा.पोलिस उपनिरीक्षक जयसिंगपूर यांनी पत्र पाठवल्यानुसार अर्जदार यांचे खाते फ्रिज करणेत आले आहे. तसेच अर्जदार यांनी त्यांच्या सोन्याच्या कर्जाचा हफ़्ता व व्याज भरलेले नाही त्यामुळेव्याजाची रक्कमही वाढ़त आहे व जाबदारांचे देखील अपरिमित नुकसान होत आहे

8) सबब जाबदारांची विनंती कि,

अ)अर्जदारांचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

ब)मे. न्यायालय अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन खाते unfreez करण्याच्या निर्णयाप्रत आलेस अर्जदार यांचे जाबदार यांच्या शाखेमध्ये असलेले आय. डी. नं. 2270365 कर्ज खाते नं. 30100040364580 या क्रमांकावर त्यांचे असलेले सोने तारण ठेवून दि. 25/3/2026 रोजी 12 महिन्यांच्या कालावधीकरीता र रु 3000/- घेतलेले संपूर्ण कर्जाची परत फ़ेड व्याजासह करणेच्या अथवा थकित व्याज व मुदद्ल भरुन खाते Regular करण्याच्या अटी व शर्ती घालाव्यात हि विनंती

क) जरुरतर म्हणणे दुरुस्तीस अथवा जादा म्हणणे देणेस परवानगी असावी

ड) इतर योग्य ते न्यायाचे हुकुम जाबदार यांच्या वतीने व्हावेत

येणेप्रमाणे म्हणणे असे

जयसिंगपूर

ता.20/6/2026

Adv. A. G. Kamble

CAPRI GLOBAL CAPITAL LIMITED JAYSINGPUR